## केबल ऑपरेटर यांना नोंदणी प्रमाणपत्र व मुंबई करमणूक कर अधिनियम,१९२३ चे कलम ४(२)(ब) अंतर्गतची मासिक करमणूक कर भरण्याची परवानगी प्राप्त करुन घेण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावयाचे आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्राची यादी

ooooo

१.विहित नमुन्यातील अर्ज - शासन परिपत्रक दि. १२ मे,१९९८ नुसार (नमुना सोबत जोडला आहे)

२.केंद्र शासनाच्या केबल टेलिव्हीजन नेटवर्कस (रैग्युलेशन) ॲक्ट,१९९५ अनुसार पोस्ट ऑफिस कडून प्राप्त करुन घेतलेले नोंदणी प्रमाणपत्र - शासन परिपत्रक दि. १२ मे,१९९८ नुसार

३.विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र रु.१००/- चे मुद्राक कागदावर टंकलिखीत केलेले - शासन परिपत्रक दि. ३१ जानेवारी, २००१ नुसार (नमुना सोबत जोडला आहे)

४.केबल जोडणीधारकांची यादी विहित नमुना प्रपंत्र अ मध्ये शासन परिपत्रक दि. ३१ जानेवारी, २००१ नुसार (नमुना सोबत जोडला आहे)

५.अनामत ठेवीची रक्कम (केबल ऑपरेटर्स करिता) शासन परिपत्रक दि.१ डिसेंबर,१९९८ व मा.आयुक्त,अमरावती यांचे पत्र दिनांक १ मार्च,२०११ नुसार अ व ब वर्ग नगर परिषद हद्दीतील केबल ऑपरेटर्सकरिता ते जोडणीधारका कडून दरमहा घेत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या एकुण पैशाच्या १०% रकमेचे अथवा रु.२०००/- चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र क वर्ग नगर परिषद हद्दीतील व ग्रामिण भागातील केबल ऑपरैटर्स करिता ते जोडणीधारकाकडून दरमहा घेत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या एकुण पैशाच्या १०% रकमेचे अथवा रु.५००/- चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र

६.अनामत ठेवीची रक्कम - बहुविध यंत्रणा परिचालक (मल्टिसिस्टिम ऑपरेटर) करिता शासन निर्णय दि.३ मार्च,१४ नुसार बहुविध यंत्रणा परिचालक यांनी प्रतिज्ञापत्राच्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयात घोषित केल्यानुसार एकुण जोडण्यापोटी जोडणी धारकां कडून प्राप्त करुन घेत असलेल्या मासिक आकारणीच्या प्रमाणात तीन महिण्यांकरिता आकारण्यांत येणारी रक्कम अथवा रु.५ लाख यापैकी जी रक्कम जास्त आहे ती रक्कम सुरुक्षा ठेव म्हणून रोख अथवा बँक गॅरंटीच्या स्वरुपात जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध करुन देण्यातं यावी. तसेच संबंधित मल्टिसिस्टिम ऑपरेटने स्थायी/जंगम मालमत्तेची अद्यावत माहिती वेळीवेळी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावी.

७. ज्या बहुविध यंत्रणा परिचालक (मल्टी सिस्टिम ऑपरेटर) यांचेकडून केबल पॉईन्ट घेतला आहे त्या एम.एस.ओ.चे नांव व पत्ता

८. अर्जदार केबल ऑपरेटर यांचे कार्यालयाचा पत्ता तसेच त्यांनी जेथे नोड/ॲम्प्लीफायर लावले आहेत त्या स्थळाचा नकाशासह पत्ता

९. ना देय प्रमाणपत्र - करमणूक कराची रक्कम थकीत नसल्याबाबत संबंधित तहसिलदार यांचे